आस्थापना विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि.२०/ १० /2023

## (गोषवारा)

२३६

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा विभागातील सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी श्री. प्रभाकर वर्तक यांना मुदतवाढ देणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा विभागामध्ये श्री. प्रभाकर सिताराम वर्तक यांची सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी या पदावर 06 महिन्यांकरीता (दि.13/04/2023 ते दि.12/10/2023 पर्यंत) तात्पुरत्या स्वरुपात रु.40,000/- ठोक मानधनावर नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्तीची मुदत दि.12/10/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे.

श्री. प्रभाकर सिताराम वर्तक, सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांनी सन 2003-04 ते सन 2015-16 या कालावधीत लेखा विभागकडे एकुण 140 आक्षेपांपैकी 100 आक्षेप वगळण्यात आले आहेत. प्रलंबित 40 आक्षेपांचे अनुपालन तयार करण्यांचे काम सुरु आहे. स्थानिक निधीकडील प्रलंबित परिच्छेदाचे अनुपालन सादर करण्यात आले असून फक्त चार परिच्छेत प्रलंबित आहेत. त्याकरीता श्री.प्रभाकर सिताराम वर्तक, सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची लेखा विभागास आवश्यकता असून त्यांना मुदतवाढ देणेबाबत दि.25/09/203 रोजीच्या पत्रान्वये लेखा विभागाने कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) अन्वये मुदत संपुष्टात आल्यानंतर 06 महिन्यांसाठी मुदवाढ देण्याचे मा. आयुक्त सो. यांना अधिकार असून मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे, परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मुदत संपत असल्याने शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26 ऑगस्ट, 2022 अन्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री.प्रभाकर सिताराम वर्तक, सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची मुदत दि.12/10/2023 रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना दि.13/10/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.14/10/2023 व दि.15/10/2023 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.16/10/2023 ते दि.15/04/2024 पर्यंत 06 महिन्यांकरीता रु.40,000/- ठोक मानधनावर नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या गोषवाऱ्यास मा.प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Samir PC\Thok Mandhan\Auditor\प्रशासकीय गोषवारा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव क्र. २३६ प्रशासकीय सभा दि.२०/१० /2023

प्रकरण क्र.२३६ मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा विभागातील सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी श्री. प्रभाकर वर्तक यांना मुदतवाढ देणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखा विभागामध्ये श्री. प्रभाकर सिताराम वर्तक यांची सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी या पदावर 06 महिन्यांकरीता (दि.13/04/2023 ते दि.12/10/2023 पर्यंत) तात्पुरत्या स्वरुपात रु.40,000/- ठोक मानधनावर नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्तीची मुदत दि.12/10/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे.

श्री. प्रभाकर सिताराम वर्तक, सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांनी सन 2003-04 ते सन 2015-16 या कालावधीत लेखा विभागकडे एकुण 140 आक्षेपांपैकी 100 आक्षेप वगळण्यात आले आहेत. प्रलंबित 40 आक्षेपांचे अनुपालन तयार करण्यांचे काम सुरु आहे. स्थानिक निधीकडील प्रलंबित परिच्छेदाचे अनुपालन सादर करण्यात आले असून फक्त चार परिच्छेत प्रलंबित आहेत. त्याकरीता श्री.प्रभाकर सिताराम वर्तक, सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची लेखा विभागास आवश्यकता असून त्यांना मुदतवाढ देणेबाबत दि.25/09/203 रोजीच्या पत्रान्वये लेखा विभागाने कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) अन्वये मुदत संपुष्टात आल्यानंतर 06 महिन्यांसाठी मुदवाढ देण्याचे मा. आयुक्त सो. यांना अधिकार असून मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे, परंतु महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार दि.27/08/2022 रोजी मुदत संपत असल्याने शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14, दि.26 ऑगस्ट, 2022 अन्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

त्यानुसार श्री.प्रभाकर सिताराम वर्तक, सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची मुदत दि.12/10/2023 रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांना दि.13/10/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.14/10/2023 व दि.15/10/2023 रोजी शासकीय सुट्टी असल्याने दि.16/10/2023 ते दि.15/04/2024 पर्यंत 06 महिन्यांकरीता रु.40,000/- ठोक मानधनावर नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Samir PC\Thok Mandhan\मुदतवाढ\प्रशासकीय ठराव - Copy1.doc

<u>आस्थापना विभाग</u>

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## (गोषवारा) दि. २०।९।२०२३

२३०

विषय :- सेवाकरार पदावरील तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांना मुदतवाढ देणेबाबत

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागात सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची जा.क्र.मनपा/आस्था/3655/2021-22, दि.15/03/2022 रोजीच्या आदेशान्वये सेवाकरार पध्दतीने मासिक पारिश्रमिक रु.38,625/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यात आली असून प्रशासकीय सभा दि.12/04/2023, ठराव क्र.22 अन्वये दि.16/03/2023 ते दि.15/09/2023 पर्यात 06 महिन्यांकीरता नियुक्ती नविकरण करण्यात आले होते. सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची मुदत दि.15/09/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे.

लेखापरीक्षणाचे सुरु असलेले काम पुर्ण करणेसाठी श्री. जयवंत रघुनाथ शिंगटे, लेखापरिक्षण अधिकारी यांची लेखापरिक्षण विभागास आवश्यकता असल्याने त्यांना मुदतवाढ देणेबाबत संदर्भ क्र.03 अन्वये मुख्यलेखापरिक्षक यांनी कळविले आहे.

श्री. जयवंत रघुनाथ शिंगटे यांची मुदत दि.15/09/2023 रोजी संपुष्टात येत आहे. दि.16/09/2023 व दि.17/09/2023 रोजी सुट्टी असल्याने दि.18/09/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.19/09/2023 रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.20/09/2023 ते दि.19/09/2024 पर्यंत 01 वर्षाकरीता मासिक पारिश्रमिक रु.38,625/- इतक्या मानधनावर नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतच्या गोषवाऱ्यास मा. प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उपायुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Samir PC\Thok Mandhan\मुदतवाढ प्रशासकीय गोषवारा.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र. २३८ प्रशासकीय सभा दि.२०/१० /2023**

प्रकरण क्र. २३८ :- सेवाकरार पदावरील तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांना मुदतवाढ देणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागात सेवानिवृत्त लेखापरिक्षण अधिकारी यांची जा.क्र.मनपा/आस्था/3655/2021-22, दि.15/03/2022 रोजीच्या आदेशान्वये सेवाकरार पध्दतीने मासिक पारिश्रमिक रु.38,625/- इतक्या मानधनावर नियुक्ती करण्यात आली असून प्रशासकीय सभा दि.12/04/2023, ठराव क्र.22 अन्वये दि.16/03/2023 ते दि.15/09/2023 पर्यंत 06 महिन्यांकीरता नियुक्ती नविकरण करण्यात आले होते. सदर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या नियुक्तीची मुदत दि.15/09/2023 रोजी संपुष्टात आलेली आहे.

लेखापरीक्षणाचे सुरु असलेले काम पुर्ण करणेसाठी श्री. जयवंत रघुनाथ शिंगटे, लेखापरिक्षण अधिकारी यांची लेखापरिक्षण विभागास आवश्यकता असल्याने त्यांना मुदतवाढ देणेबाबत संदर्भ क्र.03 अन्वये मुख्यलेखापरिक्षक यांनी कळविले आहे.

श्री. जयवंत रघुनाथ शिंगटे यांची मुदत दि.15/09/2023 रोजी संपुष्टात येत आहे. दि.16/09/2023 व दि.17/09/2023 रोजी सुट्टी असल्याने दि.18/09/2023 रोजी 01 दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.19/09/2023 रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने दि.20/09/2023 ते दि.19/09/2024 पर्यंत 01 वर्षाकरीता मासिक पारिश्रमिक रु.38,625/- इतक्या मानधनावर नियुक्तीचे नविकरण करुन आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Samir PC\Thok Mandhan\मुदतवाढ\प्रशासकीय ठराव - Copy1.doc

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## // गोषवारा //

प्रकरण क्र.:- २३८ दि०२०/१०/२०२३

विषय :- **भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील बंद असलेल्या शवागृहाच्या ठिकाणी डायलिसिस केंद्र सुरु करणेस मान्यता देणे.**

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय हे मुख्यत्वे: हे माता व बाल रुग्णालय आहे. सदर ठिकाणी ५० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित आहे. सार्वजनिक बांधकाम/विद्युत विभाग यांच्या दि.२८/०८/२०२३ च्या सादर अहवालामध्ये नमूद केल्यानुसार सन 2008 मध्ये 16 शव ठेवण्याकरीता (४ Unit X ०४ Nos. १६ l Body Storage) इतक्या क्षमतेच्या शीतपेट्या खरेदी करुन त्याठिकाणी बसवून कार्यन्वित करण्यात आल्या होत्या. सदर शवागृहाचा नियमितपणे वापर सन 2020 पर्यंत रुग्णालय प्रशासनामार्फत वापर सुरु होता. परंतू मार्च 2020 मध्ये कोविड सारख्या महामारीचा शिरकाव झाल्यामुळे रुग्णालय प्रशासनामार्फत सदर शवागृहात मृत व्यक्तीचे शव ठेवणे व वापर करणे बंद झाले. दरम्यान शहरातील भाईंदर (प.) भारतरत्न पं. भीमसेन जोशी रुग्णालयातील शवपेट्यांचा वापर सुरु करण्यात आलेला होता. तथापि विद्युत/विभागाच्या अहवालानूसार सदर शवपेटया पुर्णपणे कालबाहय झालेल्या आहेत. नविन शवपेटया खरेदी करणेकामी सन २०२३-२४ अदांजपत्रकात तरतूद उपलब्ध करणे देखील गरजेचे आहे. त्यामुळे सद्या नवीन शीत शवपेट्या खरेदी करण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण होणे शक्य नाही

त्याचप्रमाणे दि. २८/०८/२०२३ रोजी सन्मा. आमदार, सौ. गिता जैन यांच्या अध्यक्षतेखाली पं.भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, टेंबा येथे आढावा सभा पार पडली. सदर सभेमध्ये टेंबा रुग्णालयाचे अधिक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून मा. उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य), प्र.वैद्यकीय आरोग्य अधिकारी, भा. इंदिरा गांधी रुग्णालयाचे अधिक्षक व स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ यांच्या समवेत मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे हे उपस्थित होते. सदर सभेमध्ये शासनामार्फत नविन ९ शवपेटया जलदगतीने उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच सदर शवागृहाचे नुतनीकरण करुन Modular अद्यावत शवागृह अधिक क्षमतेसह तयार करुन देण्यात येईल, असे मा. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय ठाणे यांनी सांगितले आहे. तरी अश्याप्रकारे टेंबा येथे पर्यायाने अतिरिक्त नविन शीतशवपेट्या उपलब्ध होऊन शवागृहाची क्षमता वाढणार आहे. भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील शवागृहाच्या शवपेट्या कालबाह्य झालेले आहेत व तात्काळ खरेदी प्रक्रिया तरतुद उपलब्ध नसल्यामुळे होऊ शकत नाही, असे विद्युत विभागाने नमुद केले आहे. त्याचप्रमाणे दि.१७/०८/२०२३ रोजी मा. आयुक्त साो. यांच्या बैठकीमध्ये भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये डायलेसिस केंद्राची क्षमता वाढविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय सद्या सुरु असलेल्या केंद्रामध्ये ८ डायलिसीस मशीन्स सुरु आहेत व प्रत्येक रुग्णाच्या डायलिसीस करीता साधारणत: ४ तास लागतात. सदर डायलिसीस केंद्रामध्ये सद्यस्थितीत दररोज सरासरी १५ रुग्णांचे डायलिसीस करण्यात येतात. दारिद्रय रेषेखालील रुग्ण व केशरी

रेशनकार्ड असणाऱ्या रुग्णांचे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलिसीस करण्यात येते व इतर रुग्णांकडून रु. २००/- प्रति डायलिसीस शुल्क आकारण्यात येते. सदर केंद्रामध्ये येणाऱ्या रुग्णांची वाढती संख्या पाहता या ठिकाणी आणखी काही डायलिसिस मशिनस उपलब्ध झाल्यास उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसाठी ते सोयीस्कर होईल. परंतु सद्या सुरु असलेल्या ठिकाणी नवीन डायलिसिस मशीन्स व बेड करिता जागा अपुरी पडणार आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सदर रुग्णालयातील शवागृहाच्या जागेत ८ ते १० डायलिसीस मशीन व RO Plant उपलब्ध केल्यास त्या ठिकाणी डायलिसीस सेवा सुरु करणे शक्य आहे.

तरी सदर केंद्राची कार्यक्षमता वाढविण्यासाठी १० डायलिसीस मशीन्स खरेदी सोबत RO Plant उभारणे देखील आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजे रु. १ कोटी खर्च अपेक्षित आहे. तसेच कार्यरत नेफ्रोलॉजीस्ट व टेक्निशीयन यांना अतिरिक्त मानधन देणे आवश्यक आहे.

दरम्यान CSR फंडामधून बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या ६ डायलिसिस मशीन व RO प्लांट मिरा भाईंदर महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणेबाबत मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.१७/०२/२०२३ रोजी विनंती पत्र पाठवले आहे. तथापि, अद्यापर्यंत मशिन प्राप्त झाल्या नाहीत, त्यामुळे पुन्हा शासनास पत्र देणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे सद्या कार्यरत असलेल्या डायलिसीस केंद्राची क्षमता वाढविण्याकरिता बंद असलेल्या शवागृहाच्या ठिकाणी डायलिसीस केंद्र सुरु करणेकरीता १० डायलिसीस मशीन व RO Plant खरेदी करणे, नेफ्रोलॉजीस्ट व टेक्निशीयन यांना त्यासाठी आवश्यक मानधन देणे व या कामाकरीता तरतूद उपलब्ध नसल्याने पुर्नविनियोजन करणे व यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तसेच CSR च्या माध्यमातुन डायलिसीस मशीन्स प्राप्त करणेकरीता कार्यवाही करणेदेखिल आवश्यक आहे.

सबब, शवागृह बंद करुन त्या ठिकाणी डायलेसिस केंद्र तयार करणेस मा. महासभेची प्रशासकीय मान्यता आवश्यक आहे. सद्यस्थितीत मा. महासभा अस्तित्वात नसल्याने नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ२०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि.२६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. त्यानुसार मा. प्रशासक यांची मान्यता असावी.

(संजय शिंदे)
उपायुक्त (सार्व. आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. प्रशासकीय ...ी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. २०/१०/२०२३ वेळ ...
रजिस्टर नोंद अ. क्र. ____ वर्ष २०२३/२४
लिपीक
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दि.२०/१०/२३रोजी सायं. ५.०० वाजता.**

२३८

**विषय क्र. :- भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील बंद असलेल्या शवागृहाच्या ठिकाणी डायलिसिस केंद्र सुरु करणेस मान्यता देणे.**

**कार्यालयीन प्रस्तावना**

भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय हे मुख्यत्वे: हे माता व बाल रुग्णालय आहे. सदर ठिकाणी ५० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित आहे. सार्वजनिक बांधकाम/विद्युत विभाग यांच्या दि.२८/०८/२०२३ च्या सादर अहवालामध्ये नमूद केल्यानुसार सन 2008 मध्ये 16 शव ठेवण्याकरीता (४ Unit X ०४ Nos. १६ I Body Storage) इतक्या क्षमतेच्या शीतपेट्या खरेदी करुन त्याठिकाणी बसवून कार्यन्वित करण्यात आल्या होत्या. सदर शवागृहाचा नियमितपणे वापर सन 2020 पर्यंत रुग्णालय प्रशासनामार्फत वापर सुरु होता. परंतू मार्च 2020 मध्ये कोविड सारख्या महामारीचा शिरकाव झाल्यामुळे रुग्णालय प्रशासनामार्फत सदर शवागृहात मृत व्यक्तीचे शव ठेवणे व वापर करणे बंद झाले. दरम्यान शहरातील भाईंदर (प.) भारतरत्न पं. भीमसेन जोशी रुग्णालयातील शवपेट्यांचा वापर सुरु करण्यात आलेला होता. तथापि विद्युत/विभागाच्या अहवालानूसार सदर शवपेटया पुर्णपणे कालबाहय झालेल्या आहेत. नविन शवपेटया खरेदी करणेकामी सन २०२३-२४ अदांजपत्रकात तरतूद उपलब्ध करणे देखील गरजेचे आहे. त्यामुळे सद्या नवीन शीत शवपेट्या खरेदी करण्याची प्रक्रिया तात्काळ पूर्ण होणे शक्य नाही.

त्याचप्रमाणे दि. २८/०८/२०२३ रोजी सन्मा. आमदार, सौ. गिता जैन यांच्या अध्यक्षतेखाली पं.भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, टेंबा येथे आढावा सभा पार पडली. सदर सभेमध्ये टेंबा रुग्णालयाचे अधिक्षक, मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून मा. उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य), प्र.वैद्यकीय आरोग्य अधिकारी, भा. इंदिरा गांधी रुग्णालयाचे अधिक्षक व स्त्रीरोग व प्रसुती तज्ज्ञ यांच्या समवेत मा. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे हे उपस्थित होते. सदर सभेमध्ये शासनामार्फत नविन ९ शवपेटया जलदगतीने उपलब्ध करुन देण्यात येतील तसेच सदर शवागृहाचे नुतनीकरण करुन Modular अद्यावत शवागृह अधिक क्षमतेसह तयार करुन देण्यात येईल, असे मा. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय ठाणे यांनी नमूद केले आहे.

तसेच भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय सद्या सुरु असलेल्या केंद्रामध्ये ८ डायलिसीस मशीन्स सुरु आहेत सदर डायलिसीस केंद्रामध्ये सद्यस्थितीत दररोज सरासरी १५ रुग्णांचे डायलिसीस करण्यात येतात. दारिद्रय रेषेखालील रुग्ण व केशरी रेशनकार्ड असणाऱ्या रुग्णांचे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलिसीस करण्यात येते व इतर रुग्णांकडून रु. २००/- प्रति डायलिसीस शुल्क आकारण्यात येते. सदर केंद्रामध्ये येणाऱ्या रुग्णांची वाढती संख्या पाहता या ठिकाणी आणखी काही डायलिसिस मशिन्स उपलब्ध झाल्यास उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसाठी ते सोयीस्कर होईल. परंतु सद्या सुरु असलेल्या ठिकाणी नवीन डायलिसिस मशीन्स व बेड करिता जागा अपुरी पडणार आहे. त्यामुळे सदर रुग्णालयातील शवागृहाच्या जागेत ८ ते १० डायलिसीस मशीन व RO Plant उपलब्ध केल्यास त्या ठिकाणी डायलिसीस सेवा सुरु करणे शक्य आहे.

तरी सदर केंद्राची कार्यक्षमता वाढविण्यासाठी १० डायलिसीस मशीन्स खरेदी सोबत RO Plant उभारणे देखील आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजे रु. १ कोटी खर्च अपेक्षित आहे. तसेच कार्यरत नेफ्रोलॉजीस्ट व टेक्निशीयन यांना अतिरिक्त मानधन देणे आवश्यक आहे.

दरम्यान CSR फंडामधून बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या ६ डायलिसिस मशीन व RO प्लांट मिरा भाईंदर महानगरपालिकेस उपलब्ध करुन देणेबाबत तत्कालीन मा. आयुक्त सो यांनी मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग दि.१७/०२/२०२३ रोजी विनंती पत्र पाठवले आहे.

अशाप्रकारे सद्या कार्यरत असलेल्या डायलिसीस केंद्राची क्षमता वाढविण्याकरिता बंद असलेल्या शवागृहाच्या ठिकाणी डायलिसीस केंद्र सुरु करणेकरीता १० डायलिसीस मशीन व RO Plant खरेदी करणे, नेफ्रोलॉजीस्ट व टेक्निशीयन यांना त्यासाठी आवश्यक मानधन देणे व या कामाकरीता तरतूद उपलब्ध नसल्याने पुनर्विनियोजन करणे व यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे यासोबतच CSR च्या माध्यमातुन डायलिसीस मशीन्स प्राप्त करणेकरीता कार्यवाही करणे आवश्यक आहे.

नगर विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग २१)/नवि-१४, दि.२६/०८/२०२२ अन्वये महाराष्ट महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषत: कलम ४५२ अ चा (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार मा. आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांचा अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमूद प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ( २३८ ) दि.२०/१०/२०२३**

मिरा महानगरपालिकेच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील बंद असलेल्या शवागृहाच्या ठिकाणी डायलिसिस केंद्र सुरु करणेस मान्यता देण्याच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद विशेषतः कलम 452 अ चा (1 अ) व (ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ2020/प्र.क्र.71 (भाग 21)/नवि-14, दि. 26/08/2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरुन सार्वजनिक आरोग्य विभागाकरीता भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयातील बंद शवागृहाच्या ठिकाणी डायलिसिस केंद्र कार्यान्वित करण्यासाठी तरतूद उपलब्ध नसल्याने प्रथमत: CSR व्दारे डायलिसीस मशीन्स प्राप्त करण्याची कार्यवाही करावी तद्नंतर आवश्यक करुन पुनर्विनियोजन करुन आवश्यक १० पैकी CSR व्दारे प्राप्त मशीन्सची संख्या वगळून उर्वरित डायलिसीस मशीन व RO Plant खरेदी करणे, नेफ्रोलॉजीस्ट व टेक्निशीयन यांना त्यासाठी आवश्यक मानधन देणे व यासाठी येणाऱ्या अंदाजे रु. १ कोटी खर्चास आर्थिक व प्रशासकीय प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## पे अॅण्ड् पार्क विभाग

मा. प्रशासकीय सभा दिनांक २०/१०/२०२३

// गोषवारा //

**प्रकरण क्र.२३१**:- मिरा भाईंदर शहरामध्ये विविध १५ ठिकाणी रस्त्यालगत पे अॅण्ड् पार्क सुविधा (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेस मंजूरी मिळणेबाबत.
Tender ID 2023_MBMC_886708_1

मा. प्रशासकीय सभा दि. १७/०३/२०२३ ठराव क्र. ३०६ अन्वये मिरा भाईंदर शहरामध्ये विविध १५ ठिकाणी रस्त्यालगत पे अॅण्ड् पार्क सुविधा (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेबाबतची निविदा एजन्सी/संस्था यांचेकडून मोहोरबंद दर E-Tendering पध्दतीने मागविण्यांत आल्या होत्या.

सदर निविदा सुचना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच दि.०८/०५/२०२३ रोजीच्या दै.लोकमत, दै.ग्लोबल टाईम्स्, दै. महाराष्ट्र जनमुद्रा या वृत्तपत्रातून खालील १५ ठिकाणी रस्त्यालगत पे अॅण्ड पार्क सुविधा ठेका पध्दतीने चालविण्यासाठी (वाहनतळ) प्रसिध्द करण्यांत आलेली होती.

| अ.क्र. | स्थळ | पार्कींग क्षमता अंदाजे | |
|---|---|---|---|
| | | चारचाकी | दुचाकी |
| | | ९६ | १९६ |
| १ | भाईंदर पश्चिम ६० फिट रोड (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) | १०० | २०० |
| २ | भाईंदर पश्चिम ९० फिट रोड (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) (१० ठिकाणी) | ० | १०० |
| ३ | भाईंदर पश्चिम स्टेशन रोड- बालाजी चौक (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (२ ठिकाणी) | | |
| ४ | भाईंदर पूर्व, गोल्डन नेस्ट पोलीस चौकी ते गोडदेव स्मशानभूमी, प्रफुल पाटील चौक रोड(रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (२७ ठिकाणी) | ३९६ | ३९२ |
| ५ | मिरारोड, एस.के.स्टोन पोलीस चौकी ते शितलनगर नाका (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (९ ठिकाणी) | ५० | १७४ |
| ६ | मिरा रोड, दिपक हॉस्पीटल ते एस.के. स्कूल इंद्रलोक फेज-३ ते सेव्हन इलेव्हन रेसिडन्सी पार्क व्हयू हॉटेल पर्यंत (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) (३६ ठिकाणी) | ३८६ | ४०० |
| ७ | मिरा रोड रोड स्टेशन ते जोगर्स पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (८ ठिकाणी) | ५६ | ६२ |
| ८ | मिरारोड, कनकिया रोड ते रश्मी प्राईम कॉर्नर पर्यंत (व्ही पॉवर जिम) (रस्त्याच्या एका बाजूनी) (७ ठिकाणी) | २२७ | ६६६ |
| ९ | मिरारोड,लतिफ पार्क ते बेवर्ली पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (१४ ठिकाणी) | २०० | २०५ |
| १० | मिरा रोड, पुनम गार्डन ते हटकेश सालासार ऑर्चिड इमारती पर्यंत (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) (१२ठिकाणी) | २५० | ४५४ |
| ११ | मिरा रोड शितल नगर नाका ते मिरारोड रेल्वे स्टेशन ते मच्छी मार्केट पर्यंत (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (११ ठिकाणी) | १०० | ४०० |
| १२ | मिरा रोड शांती शॉपिंग सेंटर ते अस्मिता गार्डन (पूनम सागर रोड) (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (२४ ठिकाणी) - | २८६ | ४९० |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | मिरा रोड नयानगर रेल्वे समांतर रस्ता (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी ) - | १४१ | ४२४ |
| १४ | मिरा रोड सिल्व्हर पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी ) - | २८५ | ८५० |
| १५ | मिरा रोड प्लेझन्ट पार्क पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी ) - | ३१० | ९३० |
| | एकूण | २८८३ | ५९४३ |

सदर कालावधीत Tender ID २०२३_MBMC_८८६७०८_१ मध्ये खालील प्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाला होता.

| अ.क्र. | निविदा प्रसिध्दी दिनांक | कालावधी | प्राप्त् निविदा |
|---|---|---|---|
| 1 | दि. २४/०३/२०२३ ते दि. १९/०४/२०२३ | कार्यालयीन कामकाजाचे पंधरा दिवस | 0 |
| 2 | प्रथम मुदतवाढ दि. २०/०४/२०२३ ते ०८/०५/२०२३ | कार्यालयीन कामकाजाचे दहा दिवस | 1 |
| 3 | द्वितीय मुदत वाढ दि. ०८/०५/२०२३ ते दि.१६/०५/२०२३ | कार्यालयीन कामकाजाचे सात दिवस | 1 |

सदर निविदेत द्वितीय मुदतवाढीत मे. भलावी ग्रुप यांची एकमात्र निविदा प्राप्त् झालेली होती. महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग -४, दि. ०१/१२/२०१६ प्रकरण क्र. ०४.४.३.१ नुसार मे.भलावी ग्रुप यांची निविदा उघडण्यात आली. सदर निविदेत मे. भलावी ग्रुप हे तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या पात्र ठरले आहेत. मे.भलावी ग्रुप यांनी निविदेत खालील प्रमाणे जास्तीचे दर सादर केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **टेंडर आय.डी क्र.** | **निविदेचा एकूण कालावधी** | **वाहन क्षमता** | **मनपाने निश्चित केलेली मुल्याधारित रक्कम्** | **निविदाधारक मे. भलावी ग्रुप यांनी निविदेत सादर केलेली मुल्याधारित रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १. | Tender ID 2023_MBMC_886708_1 | ३ वर्षे | चारचाकी -२८८३ व दुचाकी – ५९४३ | पहिले वर्ष रु.८,७९,९२,२६९/- | पहिले वर्ष रु. ८,८०,४२,२६८/- |
| | | | | दुसरे वर्ष रु. ८,७९,९२,२६९/- | दुसरे वर्ष रु. ८,८०,५२,२६८/- |
| | | | | तिसरे वर्ष रु. ८,७९,९२,२६९/- | तिसरे वर्ष रु. ८,८०,६७,२६८/- |
| | एकूण | | | रु.२६,३९,७६,८०६/- | रु.२६,४१,६१,८०४/- |

मे. भलावी ग्रुप यांनी सादर केलेल्या दरास मा. निविदा निवड समितीने दि. ३१/०५/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. मे.भलावी ग्रुप यांनी वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार एकूण ३ वर्षासाठी रक्कम रु. २६,४१,६१,८०४/- हे सर्व प्रकारचे कर विरहित मुल्याधारित रक्कम सादर केली आहे. त्यामुळे मे. भलावी ग्रुप यांनी सादर केलेल्या रक्कमेवर १८% जी.एस.टी.दरासहीत वसुल करुन भरणा करण्याची जबाबदारी ठेकेदार मे. भलावी ग्रुप यांची राहील.

सदर निविदा अंतीम प्रक्रियेमध्ये असताना वाहतुक नियंत्रणाकरिता पोलीस उप-आयुक्त(मु.) यांनी जा.क्र.५४८/ पोउआ(मुख्यालय)/मिभाववि/२०२३, दि.५/१०/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेमध्ये पार्किंग-नो-पार्किंग ठिकाणे दर्शविण्यात आलेली आहेत. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने निविदेतील पार्किंगची

ठिकाणे बाधीत होतात अथवा कशी याबाबत खातरजमा करणेकरिता बांधकाम विभागाने नियुक्त केलेले सल्लागार श्री.विवेक पै यांचे समवेत दि.१०/१०/२०२३ रोजी दु.३.०० वा. प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पडताळणी करण्यात आली. त्यानुसार सल्लागार, श्री.विवेक पै यांनी दि.११/१०/२०२३ रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये क्र.१ ते १२ येथील ठिकाणे अधिसूचनेतील नो-पार्किंगमुळे बाधीत होत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच महानगरपालिकेने सुचित केलेली उर्वरित ३ स्थळे देखील नो-पार्किंगमुळे बाधीत होत नाहीत.

तरी मे. भलावी ग्रुप यांनी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या मुल्याधारीत रक्कमेपेक्षा अधिक मुल्याधारित रक्कम सादर केलेली असल्याने त्यांना मिरा भाईंदर शहरात विविध १५ ठिकाणी पे ॲण्ड् पार्क ३ वर्षाचे कालावधीकरिता ठेका पध्दतीने चालविणेकरिता मा. प्रशासकीय सभेचे मंजूरीस्तव शिफारस असे.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

**(कल्पिता पिंपळे)**
उप-आयुक्त् (पे ॲण्ड् पार्क)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. प्रशासकीय सभा दिनांक २०/१०/२०२३

**प्रकरण क्र.२३९:-** मिरा भाईंदर शहरामध्ये विविध १५ ठिकाणी रस्त्यालगत पे अॅण्ड् पार्क सुविधा (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेस मंजूरी मिळणेबाबत.
Tender ID 2023_MBMC_886708_1

प्रशासकीय ठराव क्र. :- २३९

मा. प्रशासकीय सभा दि. १७/०३/२०२३ ठराव क्र. ३०६ अन्वये मिरा भाईंदर शहरामध्ये विविध १५ ठिकाणी रस्त्यालगत पे अॅण्ड् पार्क सुविधा (वाहनतळ) ठेका पध्दतीने चालविणेबाबतची निविदा एजन्सी/संस्था यांचेकडून मोहोरबंद दर E-Tendering पध्दतीने मागविण्यांत आल्या होत्या.

सदर निविदा सुचना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर तसेच दि.०८/०५/२०२३ रोजीच्या दै.लोकमत, दै.ग्लोबल टाईम्स्, दै. महाराष्ट्र जनमुद्रा या वृत्तपत्रातून खालील १५ ठिकाणी रस्त्यालगत पे अॅण्ड पार्क सुविधा ठेका पध्दतीने चालविण्यासाठी (वाहनतळ) प्रसिध्द करण्यांत आलेली होती.

| अ.क्र. | स्थळ | पार्कीग क्षमता अंदाजे | |
|---|---|---|---|
| | | चारचाकी | दुचाकी |
| १ | भाईंदर पश्चिम ६० फिट रोड (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) | ९६ | १९६ |
| २ | भाईंदर पश्चिम ९० फिट रोड (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) (१० ठिकाणी) | १०० | २०० |
| ३ | भाईंदर पश्चिम स्टेशन रोड- बालाजी चौक (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (२ ठिकाणी) | ० | १०० |
| ४ | भाईंदर पूर्व, गोल्डन नेस्ट पोलीस चौकी ते गोडदेव स्मशानभूमी, प्रफुल पाटील चौक रोड(रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (२७ ठिकाणी) | ३९६ | ३९२ |
| ५ | मिरारोड, एस.के.स्टोन पोलीस चौकी ते शितलनगर नाका (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (९ ठिकाणी) | ५० | १७४ |
| ६ | मिरा रोड, दिपक हॉस्पीटल ते एस.के. स्कूल इंद्रलोक फेज-३ ते सेव्हन इलेव्हन रेसिडन्सी पार्क व्हयू हॉटेल पर्यंत (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) (३६ ठिकाणी) | ३८६ | ४०० |
| ७ | मिरा रोड रोड स्टेशन ते जोगर्स पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (८ ठिकाणी) | ५६ | ६२ |
| ८ | मिरारोड, कनकिया रोड ते रश्मी प्राईम कॉर्नर पर्यंत (व्ही पॉवर जिम) (रस्त्याच्या एका बाजूनी) (७ ठिकाणी) | २२७ | ६६६ |
| ९ | मिरारोड,लतिफ पार्क ते बेवर्ली पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (१४ ठिकाणी) | २०० | २०५ |
| १० | मिरा रोड, पुनम गार्डन ते हटकेश सालासार ऑर्चिड इमारती पर्यंत (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी P१ & P२) (१२ठिकाणी) | २५० | ४५४ |
| ११ | मिरा रोड शितल नगर नाका ते मिरारोड रेल्वे स्टेशन ते मच्छी मार्केट पर्यंत (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (११ ठिकाणी) | १०० | ४०० |
| १२ | मिरा रोड शांती शॉपिंग सेंटर ते अस्मिता गार्डन (पूनम सागर रोड) (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी) (२४ ठिकाणी) - | २८६ | ४९० |
| १३ | मिरा रोड नयानगर रेल्वे समांतर रस्ता (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी ) - | १४१ | ४२४ |
| १४ | मिरा रोड सिल्व्हर पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी ) - | २८५ | ८५० |
| १५ | मिरा रोड प्लेझन्ट पार्क पार्क (रस्त्याच्या दोन्ही बाजूनी ) - | ३१० | ९३० |
| | एकूण | २८८३ | ५९४३ |

सदर कालावधीत Tender ID २०२३_MBMC_८८६७०८_१ मध्ये खालील प्रमाणे प्रतिसाद प्राप्त झाला होता.

| अ.क्र. | निविदा प्रसिध्दी दिनांक | कालावधी | प्राप्त् निविदा |
|---|---|---|---|
| 1 | दि. २४/०३/२०२३ ते दि. १९/०४/२०२३ | कार्यालयीन कामकाजाचे पंधरा दिवस | 0 |
| 2 | प्रथम मुदतवाढ दि. २०/०४/२०२३ ते ०८/०५/२०२३ | कार्यालयीन कामकाजाचे दहा दिवस | 1 |
| 3 | द्वितीय मुदत वाढ दि. ०८/०५/२०२३ ते दि.१६/०५/२०२३ | कार्यालयीन कामकाजाचे सात दिवस | 1 |

सदर निविदेत द्वितीय मुदतवाढीत मे. भलावी ग्रुप यांची एकमात्र निविदा प्राप्त् झालेली होती. महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग -४, दि. ०१/१२/२०१६ प्रकरण क्र. ०४.४.३.१ नुसार मे.भलावी ग्रुप यांची निविदा उघडण्यात आली. सदर निविदेत मे. भलावी ग्रुप हे तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या पात्र ठरले आहेत. मे.भलावी ग्रुप यांनी निविदेत खालील प्रमाणे जास्तीचे दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | टेंडर आय.डी क्र. | निविदेचा एकूण कालावधी | वाहन क्षमता | मनपाने निश्चित केलेली मुल्याधारित रक्कम् | निविदाधारक में. भलावी ग्रुप यांनी निविदेत सादर केलेली मुल्याधारित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | Tender ID 2023_MBMC_886708_1 | ३ वर्षे | चारचाकी -२८८३ व दुचाकी – ५९४३ | पहिले वर्ष रु.८,७९,९२,२६९/- | पहिले वर्ष रु. ८,८०,४२,२६८/- |
| | | | | दुसरे वर्ष रु. ८,७९,९२,२६९/- | दुसरे वर्ष रु. ८,८०,५२,२६८/- |
| | | | | तिसरे वर्ष रु. ८,७९,९२,२६९/- | तिसरे वर्ष रु. ८,८०,६७,२६८/- |
| | एकूण | | | रु.२६,३९,७६,८०६/- | रु.२६,४१,६१,८०४/- |

मे. भलावी ग्रुप यांनी सादर केलेल्या दरास मा. निविदा निवड समितीने दि. ३१/०५/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. मे.भलावी ग्रुप यांनी वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार एकूण ३ वर्षासाठी रक्कम रु. २६,४१,६१,८०४/- हे सर्व प्रकारचे कर विरहित मुल्याधारित रक्कम सादर केली आहे. त्यामुळे मे. भलावी ग्रुप यांनी सादर केलेल्या रक्कमेवर १८% जी.एस.टी.दरासहीत वसुल करुन भरणा करण्याची जबाबदारी ठेकेदार मे. भलावी ग्रुप यांची राहील.

सदर निविदा अंतीम प्रक्रियेमध्ये असताना वाहतुक नियंत्रणाकरिता पोलीस उप-आयुक्त(मु.) यांनी जा.क्र.५४८/ पोउआ(मुख्यालय)/मिभाववि/२०२३, दि.५/१०/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेमध्ये प्राप्त झाली. त्यामध्ये पार्किंग-नो-पार्किंग ठिकाणे दर्शविण्यात आलेली आहेत. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने निविदेतील पार्किंगची ठिकाणे बाधीत होतात अथवा कशी याबाबत खातरजमा करणेकरिता बांधकाम विभागाने नियुक्त केलेले सल्लागार श्री.विवेक पै यांचे समवेत दि.१०/१०/२०२३ रोजी दु.३.०० वा. प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन पडताळणी करण्यात आली. त्यानुसार सल्लागार, श्री.विवेक पै यांनी दि.११/१०/२०२३ रोजी अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये अ.क्र.१ ते १२ येथील ठिकाणे अधिसूचनेतील नो-पार्किंगमुळे बाधीत होत नसल्याचे नमूद केले आहे. तसेच महानगरपालिकेने सुचित केलेली उर्वरित ३ स्थळे देखील नो-पार्किंगमुळे बाधीत होत नाहीत.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ – २०२०/प्र.क्र. ७१(भाग -२)नवि-१४ दि. २६ ऑगस्ट् अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यांत आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी मे. भलावी ग्रुप यांनी महानगरपालिकेने निश्चित केलेल्या मुल्याधारित रक्कमेपेक्षा अधिक मुल्याधारित रक्कम सादर केलेली असल्याने त्यांना मिरा भाईंदर शहरात विविध १५ ठिकाणी पे ॲण्ड् पार्क ३ वर्षाचे कालावधीकरिता ठेका पध्दतीने चालविणेकरिता ही प्रशासकीय सभा मंजूरी देत आहे.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(संजय श्रीपतराव काटकर)**
आयुक्त तथा प्रशासक (भा.प्र.से)
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\PAY & PARK DEPT\Goshwara\मिरा भाईंदर 15 वाहनतळे 2.doc